नि. फौ. ख. क्र. २३३/२०२२ निशाणी क्र.१६

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – शाहीन बानो शेख रफीक

वय – अं. ५० वर्षे, व्यवसाय – घरकाम

पत्ता – रा. पारस, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. दि.२२.११.२०२१ रोजी रात्री ८ वा. सुमारास मी माझ्या घराच्या अंगणामध्ये झाडू मारत होती. त्यावेळी माझे पती व मुलगा किराणा आणण्याकरीता बाहेरे गेले होते. त्यामुळे मी घरामध्ये एकटी होती. रात्री ८ वा. सुमारास मी अंगणामध्ये झाडू मारत असताना शेख मुज्जू याने त्याच्या हातातील बॅटरी माझ्या घराच्या दिशेने चमकविली. त्यानंतर शेख मुज्जू हा अंगणामध्ये आला व माझा हात पकडला व मला त्याच्या कवठ्यात उचलले, त्यावेळी मी ओरडले. त्यावेळी तो मला म्हणाला की, ''अगर तू पोलीस में रिपोर्ट देगी तो तूझे जान से मार दुंगा.'' त्यानंतर तो तेथून निघून गेला.

२. सदर घटनेची माहिती माझे पती व मुलगा घरी आल्यानंतर त्यांना त्याबाबत मी सांगितले. आरोपीने मला धमकी दिली तसे मला वाईट वाटले व मी घाबरले होते. सदर घटनेची माहिती देण्याकरीता मी पो.स्टे. येथे गेले होते. तेथे सदर घटनेची माहिती मी पोलीसांना दिली. त्यावरुन माझी फिर्याद नोंद करुन घेतली. आता मला सदर रिपोर्ट दाखविण्यात आला त्यावर माझा अंगठ्याचा ठसा असून त्यातील संपुर्ण मजकूर मला पोलीसांनी वाचून दाखविला होता तो माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येत आहे. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझा अंगठ्याचा ठसा असून त्यातील संपुर्ण मजकूर मला पोलीसांनी वाचून दाखविला होता तो माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येत आहे.

३. सदर घटनेबाबतची चौकशी पोलीसांनी माझ्याकडे केली होती. तसेच माझा जबाब नोंद करुन घेतला होता. मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले होते. माझा जबाब न्यायालयामध्ये नोंद करुन घेतला होता. आता न्यायालयात बंद लिफाफा त्यावर तत्कालीन दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांची सही असलेला लिफाफा उघडण्याची परवानगी देण्यात आली. आता न्यायालयासमोर सदर सिलबंद लिफाफा उघडण्यात आला, त्यास **नि.क्र.१९** देण्यात येत आहे. त्यामध्ये फौ.प्र.सं. १६४ अन्वयेचा जबाब मिळून आला. आता मला सदरचा जबाब दाखविण्यात आता तो तोच असून त्यावर माझा अंगठ्याचा ठसा असून त्यातील मजकूर मी न्यायालयासमोर सांगितला होता व तो मला वाचून दाखविण्यात आला होता. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येत आहे. तसेच आता न्यायालयासमोर खाकी रंगाचा सिल बंद लिफाफा उघडण्याची परवानगी देण्यात आली. सदर लिफाफ्यावर दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांची सही असल्याचे दिसून येते, सदर लिफाफ्यास **नि.क्र.२१** देण्यात येत आहे. सदर लिफाफ्यामधून फिर्यादी हिचा नि.क्र.२० प्रमाणेचा जबाबाची प्रत दिसून येते सदरची प्रत ही तपासिक अधिकारी यांची असल्याचे दिसते. म्हणून त्यास निशाणी देण्यात येत नाही.

४. आरोपी शेख मुज्जू यास पाहिल्यास मी ओळखू शकतो. साक्षीदार हिने आज आरोपीस न्यायालयात तो असल्याबाबत ओळखले आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. टी. इंगळे यांचे मार्फत उलटतपास सुरुः</u>**

५. हे म्हणणे खरे आहे की, मला तीन मुले आहेत. त्यांची नावे शेख शकील, शेख अकील व शेख शफीक अशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मोठ्या मुलाचे लग्न झालेले आहेत तसेच माझा दोन व तीन नंबर मुलाचे लग्नाचे वय झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझे कुटुंब एकत्रीत एकाच घरामध्ये राहतात. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांना दाखविलेली घटनास्थळाची जागा ही आठवडी बाजारातील सरकारी जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या घटनास्थळाच्या जागेवर बऱ्याच लोकांनी जनावरांची गोठे बांधलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझ्यामध्ये बऱ्याच वर्षांपासून गुरांच्या गोठ्याच्या जागेवरुन वाद सुरु आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी याच्या बायकोने पो.स्टे. येथे दिलेल्या रिपोर्टवरुन माझा मुलगा शफीक याच्या विरुध्द विद्यमान न्यायालयात

फौजदारी खटला सुरु आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणाची पुढील तारीख ही १५.०९.२०२५ आहे, त्याबाबत मला माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की, फरीन अंजुम शेख मुजेद हिची छेळछाळ केल्याबद्दल माझ्या मुला विरुध्द सदरची केस सुरु आहे.

६. मी राहत असलेल्या घरापासून पोलीस चौकी यामधील पायी चालत गेल्यास अर्धा तास लागतो तसेच बाळापूर पो.स्टे. येथे पारस येथून रिक्षाने आल्यास अर्धा तास वेळ लागतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या वडीलाचे नाव मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या वडीलाचे नाव माझी फिर्याद देताना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१७ कडील रिपोर्ट हा मी माझ्या वकीलांकडून बाहेरुन तयार करुन आणून तो पोलीसांना दिला होता. मी पो.स्टे. येथे फिर्याद नोंद करण्याकरीता गेले तेव्हा पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी फिर्याद हाताने लिहून घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद देण्यापुर्वी आरोपीच्या पत्नीने माझ्या मुलाच्या विरुध्द पो.स्टे. येथे फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला माझा पती व माझा मुलगा पो.स्टे. येथे आरोपीच्या पत्नीने माझ्या मुला विरुध्द फिर्याद दाखल केली हे समजल्यानंतर मी, माझे पती व माझा मुलगा यांनी आरोपी विरुध्द सदरची फिर्याद देण्याचे ठरविले व त्यानंतर आरोपी विरुध्द फिर्याद दिली. माझा फिर्यादी जबाब हा माझ्या सांगण्याप्रमाणे नोंद करुन घेतला.

७. मी माझा जबाब पोलीसांना देतेवेळेस दि.२२.११.२०२१ रोजी रात्री ८ वा. सुमारास मी माझ्या घराच्या अंगणामध्ये झाडू मारत होती, तसेच अंगणामध्ये झाडू मारत असताना शेख मुज्जू याने त्याच्या हातातील बॅटरी माझ्या घराच्या दिशेने चमकविली, त्यानंतर शेख मुज्जू हा अंगणामध्ये आला व माझा हात पकडला व मला त्याच्या कवळ्यात उचलले, हा मजकूर मी पोलीसांना सांगितला होता. सदरचा मजकूर हा माझ्या फिर्यादी जबाबामध्ये का नाही, याचे कारण मी सांगू शकत नाही.

मध्यान्हाची वेळ झाली असल्यामुळे साक्षीदार उलटतपास दुपारच्या सत्रापर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

दिनांक : ०२.०७.२०२५.
ठिकाणः बाळापूर

( दयानंद एम. वाघमारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२), बाळापूर.

**<u>मध्यान्हानंतर आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. टी. इंगळे यांचे मार्फत उलटतपास शपथेवर सुरुः</u>**

८. सदरची तथाकथित घटना घडली त्यावेळी माझे पती व माझी मुले घरामध्ये होते व ते बाहेर आले. हे म्हणणे खरे नाही की, दि.२२.११.२०२१ रोजी मी माझ्या सरतपासामध्ये सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला सदर खोट्या गुन्ह्यामध्ये फसविण्याच्या उद्देशाने खोटी फिर्याद दाखल केली तसेच आज न्यायालयात खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या पत्नीने माझ्या मुला विरुध्द दाखल केलेल्या फिर्यादीकरीता दबाब आणण्यासाठी मी आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा न्यायालयामध्ये नोंद करण्यात आलेला जबाब कसा द्यावयाचा त्याबाबतील मी घरातून ठरवून आले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला माझा न्यायालयात जबाब नोंद करण्यापुर्वी कसा द्यावयाचा याबाबत माहिती दिली होती.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०२.०७.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.07.02 17:55:28 +0530

**(दयानंद एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. दयानंद एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | ०२/०७/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | ०२/०७/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | ०२/०७/२०२५ |